संत भक्तराज महाराज यांची शिकवण (खंड ३)

# नामाची महती आणि शिकवण्याच्या विविध पद्धती

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


– मनोगत ०४

– ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ०७

**प्रकरण १**

**भूमिका**

१. पहिल्या आवृत्तीची भूमिका ०९

२. दुसऱ्या आवृत्तीची भूमिका १०

३. तिसऱ्या आवृत्तीची भूमिका १०

४. चौथ्या आवृत्तीची भूमिका १०

५. पाचव्या आवृत्तीची भूमिका ११

**प्रकरण २**

**नामसंकीर्तनयोग**

१. नामजपाचे महत्त्व १४

२. नामजपाची वैशिष्ट्ये १६

३. नाम कार्य कसे करते ? १६

४. नामजपाचे लाभ १६

* अंतर्शुद्धी १७

* प्रारब्धनाश १७

* नवीन प्रारब्ध निर्माण न होणे १७
* श्रद्धा व भक्ती निर्माण होणे १७
* अहंभाव न उरणे १७
* अद्वैत १८
* शांती १८
* पूर्णत्व १८
* नामधारक व मृत्यू १८
५. नामाचे प्रकार १९
५ अ. आई-वडिलांनी दिलेले नाव व गुरूंनी दिलेले नाम १९
५ आ. स्वतःच्या आवडीचे नाम व गुरूंनी दिलेले नाम १९
५ इ. गुरूंनी दिलेले नाम व गुरूंचे नाव (नाम) २०
५ ई. गुरूंपेक्षा गुरूंनी दिलेले नाम महत्त्वाचे २०
५ उ. गुरूंच्या बोलण्यापेक्षा त्यांनी दिलेले नाम महत्त्वाचे २०
६. नामजपाची कृती २१
* जपमाळ २१
* नामजप कोठे करावा ? २२
* नामजप किती करावा ? २२
* भजन व नामजप २३
७. श्वास व नाम २३
७ अ. नाम श्वासाला जोडणे २३
७ आ. नाम श्वासाला जोडण्यातील लाभ २४
७ इ. प्रगतीचे लक्षण २४
८. नामजप करतांना येणाऱ्या अडचणी २४
८ अ. नामाविषयी विकल्प २४
८ आ. इतर विचार २५
८ इ. व्यवहार व नामजप २५
९. संतांची नामजपाविषयीची संवेदनशीलता ! २६
१०. नामजपातील अनुभूती २८
११. इतर साधनामार्ग व नामजप ३२

११ अ. कर्मयोग व नामजप ३३
१२. नामावर गोपींप्रमाणे प्रेम ३५
१३. नामाविषयीची बाबांची सुवचने ३५
* चिंता नको, चिंतन करा ! ३५
* नामजप सतत हवा ३६
* नाम हाच गुरु ! ३६
* माया व जप ३६
* नाम व अहंभाव ३७
* नाममात्र नाम ३७
* सर्वकाही नामच ३७
* नाम व मृत्यू ३७

## प्रकरण ३
## वागण्यातून ( अप्रत्यक्ष ) शिकविणे

१. विधवा व शुभ घटना ४०
२. संतांचा प्रसाद ४१
२ अ. संतांनी प्रसाद देणे व 'घ्या' म्हणून सांगणे, दोन्ही एकच ४१
२ आ. संतांचा स्पर्श झालेल्या सर्व गोष्टी प्रसादच असणे ४१
२ इ. भक्तांनी प्रसादाची अपेक्षा ठेवू नये ४१
३. दुसऱ्यांची सोय पहाणे ४१
४. लहानसहान गोष्टींवर लक्ष ४२
५. सर्व उत्कृष्ट करावे ४२
६. संतदर्शन, संतसेवा व तीर्थयात्रा ४३
७. नम्रता ४३
८. शिष्य ४४
८ अ. शिष्य व कुटुंबीय ४४
८ आ. शिष्याच्या श्रद्धेनुसार वागणे ४४
८ इ. पूर्वसूचना देणे ४४
८ ई. बाबांसमवेतचे भ्रमण ४४

८ उ. भंडारा ४६
८ ऊ. अहं असलेल्या साधकाने बनवलेला पदार्थ संतांनी न खाणे ४८
८ ए. देतांना भाव चांगला नसणाऱ्या साधकाने दिलेल्या वस्तू फुकट घालवणे ४८
८ ऐ. कर्मकांडात अडकू नका ४८
८ ओ. गुर्वाज्ञापालनात स्वतःच्या बुद्धीचा वापर नको ४८
८ औ. गुरूंच्या इच्छेविरुद्ध काही करता न येणे ४९
८ अं. गुरूंच्या नकळत शिष्य काही करू न शकणे ४९
८ क. शिष्याची देहबुद्धी न्यून (कमी) करणे ४९
८ ग. शिष्याचा अहंकार घालविणे ५०
८ घ. सेवा ५२
८ च. सर्वांवर प्रेम करणे ५२
८ छ. शिष्यात गुरुपणाचा अहंकार नसावा ५२
८ ज. खऱ्या शिष्याने नाव कसे लिहावे ? ५२
८ झ. संतांच्या प्रगतीविषयी शिष्यांना शिकवणे ५२
८ ट. गुरूंचा आजार व उपचार ५३
८ ठ. बाबांनी देहत्यागाच्या वेळी 'जगातील व्यवहारात सूक्ष्मातील ज्ञानाला मूल्य नाही', हे शिकवणे ५३
९. खरे ध्यान ५४
१०. 'संतांना' शिकविणे ५४
११. सर्व गुरूंचेच ५५
१२. संत व देवता यांची एकरूपता ५५

## प्रकरण ४
## अनुभूतींतून शिकविणे

१. गुरूंचे ऐकावे ५७
२. गुरुसेवेत बुद्धीचा अडथळा नको ५८
३. गुरूंविषयीचा विकल्प दूर करणे ५८
४. सर्व गुरूंच्या हातात ५८

५. गुरूंनी सांगितल्याची लगेच प्रचीती येणे ५८
६. कितीही जण जेवले, तरी अन्न उरणे ! ५९
७. गुरूंच्या सहवासात थकवा न जाणवणे ५९
८. व्यक्तीतील नकोशी वाटणारी स्पंदने संतसहवासात नष्ट होणे ५९
९. गुरूंच्या जागी श्रद्धास्थानाचे दर्शन होणे ६०
१०. गुरूंची सर्वज्ञता ६१
११. भक्ताचा नामजप होईल, असे करणे ६१
१२. शिष्याची इच्छा पूर्ण करणे ६१
१३. झोपलेल्या शिष्याच्या मनावर नियंत्रण ६२
१४. गुरूंना पत्र लिहिण्याची अनावश्यकता ! ६२
१५. अद्वैतातच वासनाविजय शक्य ६३
१६. शब्दाविण संवादिजे ६३
१७. सर्व देवता, डॉ. आठवले व स्वतः एकच असल्याचे प.पू. भक्तराज महाराजांनी सूक्ष्मातून सांगणे ६३

**प्रकरण ५. स्वप्नातून शिकविणे ६५**

**प्रकरण ६. सूक्ष्मातून ज्ञान देऊन शिकविणे ६७**

**प्रकरण ७. शब्दातीत माध्यमातून शिकविणे ६८**

**प्रकरण ८. इतिकर्तव्यता - अध्यात्माचा प्रसार ६९**

# मनोगत

## १. पहिल्या आवृत्तीची भूमिका

## [गुरुपौर्णिमा, कलियुग वर्ष ५०९४ ( १४ जुलै १९९२ )]

आमचे सद्‌गुरु प.पू. भक्तराज महाराज यांना आम्ही 'बाबा' म्हणतो. गेल्या तीन-चार वर्षांत बाबांनी वेळोवेळी अध्यात्मविषयक बरेच विवेचन / मार्गदर्शन केले व ते आम्ही लिहून घेतले. 'हे विवेचन / मार्गदर्शन जिज्ञासू व साधक यांना ज्ञात व्हावे, यासाठी एक पुस्तक लिहावे', असा विचार आमच्या मनात गेली दोन-तीन वर्षे सतत येत होता. 'या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सर्व लिखाण पूर्ण करावे', असे वाटले.

### १ अ. इदं न मम ।

### १ अ १. गुरूंवर पूर्ण श्रद्धा नसणे

अ. एक-दीड वर्षापूर्वी बाबांनी मला (डॉ. जयंत आठवले यांना) सांगितले, "आता ग्रंथाचा श्रीगणेशा करा." तेव्हा मी बाबांना म्हटले, "स्फूर्ती आल्याविना कसे लिहायचे ?" तेव्हा लक्षात आले नाही की, त्यांनी सांगितल्यावर लिहायला प्रारंभ करायला हवा होता; कारण प्रारंभ केल्यावर लगेच स्फूर्ती आली असती. आता या लिखाणाच्या संदर्भात ते मी अनुभवले.

आ. त्या वेळी मी (डॉ. जयंत आठवले यांनी) बाबांना असेही विचारले, "अनुभूतीविना कसे लिहू ?" तेव्हा हेही लक्षात आले नाही की, जसजसे लिहीत जाईन, तसतशी पुढची पुढची अनुभूती येणार आहे. हा ग्रंथ लिहितांना तेही अनुभवले.

### १ अ २. लिखाणाचा अहंकार नको

एकदा लिखाणाचा विषय निघाला होता. मी (डॉ. जयंत आठवले यांनी) म्हटले, "जोपर्यंत मला पूर्णत्वाची अनुभूती येत नाही, तोपर्यंत अध्यात्मविषयक लिखाण करणे किंवा शिकविणे मी करणार नाही." त्यावर बाबा म्हणाले, "लिखाण किंवा शिकविणे तुम्ही थोडेच करणार आहात ? तुमच्यातून मीच करणार आहे."

'भूमिका' ही या ग्रंथाची एकप्रकारे प्रस्तावनाच आहे. 'भूमिके'त साधकांना उपयुक्त असे काही विषय (मुद्दे) आहेत; म्हणून 'भूमिके'ला 'प्रकरण' असे म्हटले आहे.

ठिकठिकाणी लिहिलेल्या बाबांच्या भजनपंक्ती 'संत भक्तराज विरचित भजनामृत' या ग्रंथातील

आहेत. **– संकलक.**

## २. दुसऱ्या आवृत्तीची भूमिका

**[प.पू. भक्तराज महाराज यांचा अमृतमहोत्सव,**
**माघ शुक्ल नवमी, कलियुग वर्ष ५०९६, ( ९ फेब्रुवारी १९९५ )]**

**२ अ. शिकवणीचे सार :** बाबा कर्मकांडातील उपासना सांगत नाहीत कि ज्ञानयोगाने बुद्धी चक्रावून टाकत नाहीत. 'नाम, सेवा, त्याग व दुसऱ्यांविषयी प्रेम या साधनामार्गाने आनंदाची अनुभूती घ्या', एवढेच सांगतात व शिष्यांकडून तसे करवून घेतात.

**२ आ. आभार :** बऱ्याच साधकांनी साधना म्हणून ग्रंथाची सेवा केली. यासंबंधी बोलतांना बाबा एकदा म्हणाले होते, ''ही कामे पैशाने होणार नाहीत.'' त्यावरून 'त्यांनी किती श्रम केले असतील', ते लक्षात येईल.

## ३. तिसऱ्या आवृत्तीची भूमिका

**[नरक चतुर्दशी, कलियुग वर्ष ५१०० ( १९ ऑक्टोबर १९९८ )]**

९ फेब्रुवारी १९९५ या दिवशी बाबांचा अमृत महोत्सव झाल्यावर त्यांची प्रकृती ढासळली. तेव्हापासून १७ नोव्हेंबर १९९५ ला बाबांनी देहत्याग करेपर्यंत बहुतेक काळ आम्ही बाबांच्या समवेत राहिलो. प्रकृती ठीक नसतांनाही तेव्हा बाबांनी बरेच काही शिकविले. ते सर्व या तिसऱ्या आवृत्तीत समाविष्ट करण्यात आले आहे. – संकलक

## ४. चौथ्या आवृत्तीची भूमिका

**[मकरसंक्रांत, कलियुग वर्ष ५१०८ ( १४ जानेवारी २००७ )]**

बाबांच्या देहत्यागानंतरही त्यांच्या अनंत शिकवणीतील आणखी काही नवीन विषय त्यांच्या सान्निध्यात राहिलेल्या काही भक्तांकडून मिळत गेले. ते विषय या चौथ्या आवृत्तीत समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे होणाऱ्या ग्रंथाच्या पृष्ठसंख्यावाढीच्या कारणास्तव या चौथ्या आवृत्तीची आम्ही नव्याने २ भागांमध्ये ('खंड १' आणि 'खंड २') पुनर्मांडणी केली. – संकलक

## ५. पाचव्या आवृत्तीची भूमिका

**[अंगीरसऋषी जयंती, कलियुग वर्ष ५१११ ( २१ जून २००९ )]**

प.पू. भक्तराज महाराजांच्या काही भक्तांनी पाठवलेले नवीन लिखाण या आवृतीत अंतर्भूत केले आहे. पृष्ठसंख्यावाढीच्या कारणास्तव या पाचव्या आवृत्तीचीही आम्ही नव्याने ३ भागांमध्ये पुनर्मांडणी केली आहे – ‘खंड १ : साधनेविषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन’, ‘खंड २ : साधनाविषयक सुवचने’ आणि ‘खंड ३ : नामाची महती आणि शिकवण्याच्या विविध पद्धती’.

हा ग्रंथ वाचून काही जणांनी तरी साधनेला आरंभ करावा, अशी श्रीगुरुचरणी प्रार्थना !

**– संकलक.**